महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६/४२१
ई-मेल–desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२४-२५/२८४ दिनांक: १६/०७/२०२४

प्रति,

**मा. कुलगुरु,**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
२) मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
७) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
८) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
१०) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
११) कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१२) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
१३) रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
१४) सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

**विषय: उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

**संदर्भ:** १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दि. ४ ऑक्टोबर, २०१८
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दि. ६ सप्टेंबर, २०२१
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, दि.३१ जुलै २०२३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यांत येत असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये दि. ३१ जुलै, २०२३ शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून दि.४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० वरुन ३० व डॉक्टरेटकरिता १० विद्यार्थी अशा एकूण ४० विद्यार्थ्यांची शाखानिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ४० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:

उमेदवार व उमेदवाराचे आई / वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२४ मधील) THE (Times Higher Education) / किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२३-२४ मधील) **एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.**
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै २०२३ चा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुध्दीपत्रके पहावीत व त्याअनुषंगाने अर्जांची छाननी करण्यांत येईल.

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील "अ" दर्जाच्या वर्तमानपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात येऊन, सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत आले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी **https://fs.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिनांक ०९ ऑगस्ट, २०२४ आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात दिनांक १९ जुलै, २०२४ ते १२ ऑगस्ट, २०२४ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे.

१) सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यांत यावी.

२) आपल्या विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

३) कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.

४) आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यांत याव्यात.

५) सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्यूब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

६) सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे.

आपला

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीकरीता सादर: -

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांना माहिती साठी सविनय सादर.

प्रत आवश्यक कार्यावाही करीता: -

१) मा. संचालक, उच्च शिक्षण विभाग, पुणे, यांना सूचित करण्यात येते की, सदर जाहीरातीनुसार आपापल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांना या बाबत अवगत करावे.

२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर यांना निर्देशित करण्यात येते की, सदर जाहीरातीनुसार आपापल्या विभागातील सर्व शैक्षणिक संस्थांना या बाबत अवगत करावे.

D:\DTE 2022\Foreign Scholarship\Foreign Scholarship 2024-25\Letter to Govt\FS 2024-25 15-07-2024\Letter to VC & RO for FS 2024-25.docx